ISSN 2395-3748 | UGC APPROVED JOURNAL NO 64191
RNI REGISTRATION NO MAHMUL/2014/57148

# BULLETIN OF INDIAN
# SOCI LTURE


A Peer-Reviewed Inter-Disciplinary International Research Journal

Vol 5 I Issue 2 I Feb 2018

## समकालीन हिंदी पद्य साहित्य विवेचन

SPECIAL ISSUE

संपादक
प्रा. क्षीरसागर पी. बी | डॉ. सोळंके सी. एन.



Scanned with OKEN Scanner

मराठी साहित्यातील एक आविष्कार : ग़जल
प्रा. डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी
१५८ – १६४

मराठी कवितेतील महानगरीय जाणिवा
प्रा. डॉ. दादाराव गुंडरे
१६५ – १७२

१९९० नंतरची समकालीन मराठी कविता
प्रा. डॉ. तुळशीराम चंद्रसेन उकिरडे
१७३ – १८२

समकालीन मराठी ग्रामीण कांदबरी : एक चिंतन
प्रा. डॉ. संग्राम टेकल
१८३– १९०

मराठी ग्रामीण साहित्य आणि समकालीन ग्रामीण कादंबरी
प्रा. माया हरी फुलवरे
१९१– २०१

समकालीन आदिवासी साहित्य
लक्ष्मण गिते
२०२ – २०६

समकालीन मराठी वाङ्मयातील 'विज्ञान साहित्य' संकल्पना
प्रा. कल्पना कृष्णाजीराव जाधव
२०७ – २१६

आदिवासी कवितेचे वैशिष्ट्ये
प्रा. व्यवहारे एस. टी.
२१७ – २२४

Scanned with OKEN Scanner

VISHWABHARATI RESEARCH CENTRE

BULLETIN OF INDIAN SOCIETY AND CULTURE
ISSN 2395-3748
Vol 5. Issue 2. Feb 2018. pp. 165 - 172
http://www.vishwabharati.in
Paper received: 01 Jan 2017.
Paper accepted: 25 Feb 2017.
© VISHWABHARATI Research Centre

# मराठी कवितेतील महानगरीय जाणिवा

प्रा. डॉ. दादाराव गुंडरे

महानगर ही संकल्पना मानवी जीवनासह साहित्यावरही प्रभाव टाकताना दिसते. कारण बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक पर्यावरणास कवेत घेण्याचे काम साहित्य करते. कालानुरूप साहित्य हे अवतरते. त्यामध्ये कविता या वाङ्मय प्रकाराचे स्थान विशेष आहे. १९९० नंतरच्या कालखंडात लिहिल्या गेलेल्या समकालीन मराठी कवितेला अनेक संदर्भासह महानगरीय घडामोडींचा विशेष संदर्भ आहे. अलीकडच्या काळात शहराचे रूप झपाट्याने बदलले असून या महानगरात अनेक सुखसुविधा उपलब्ध आहेत. तशाच अनेक समस्याही निर्माण झाल्या आहेत. महानगरीय जाणीव ही शहरी व महानगरीय जीवनाशी आणि समस्येशी निगडीत आहे. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर १९९० नंतर मराठी कवितेतून महानगरीय जीवन जाणिवा मोठ्या प्रमाणात प्रकट होताना दिसतात. कारण जागतिकीकरणाने माणसाच्या जगण्याचे संदर्भ बदलले. माणसाच्या जगण्यास फारसा अर्थच उरला नाही. कमालीचे आत्मकेंद्री जीवन माणसे जगू लागली. खाऊजा धोरण व प्रसारमाध्यमांचे वाढते प्रस्थ यामुळे अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. मराठी कवितेतील महानगरीय जाणिवांचे स्वरूप लक्षात घेताना कवी ज काळात, वातावरणात जगतो

प्रा. डॉ. दादाराव गुंडरे : मराठी विभाग प्रमुख, शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

Scanned with OKEN Scanner

अशा शब्दातून महानगरातील संवेदना हरवत चाललेली माणसे व व्यवहार कवी मांडताना दिसतो. उलटे काळीज बंद कप्पे असणाऱ्या या शहरात ठिबकणारे दुःख इथे प्रत्येकाच्या दारी आहे. असे या शहरातील माणसांचे दुःख कवी अभिव्यक्त करतात.

एकीकडे माहिती तंत्रज्ञानामूळे संपूर्ण जग जवळ आले, एकमेकांशी संपर्क साधणे सहज शक्य झाले, परंतू दुसरीकडे माणसाच्या जीवन व्यवहारात, जीवन जगण्याच्या प्रवृत्तीत मोठा बदल झाला. माणसाऐवजी रोबोटसारख्या यंत्रावर विश्वास ठेवायला लागला. इथेच खऱ्या अर्थाने मानवतेच्या ऱ्हासाचा प्रारंभ झाला. ही खंत उत्तम कांबळे मजागतिकीकरणात माझी कविताफयामधून प्रकट करतात,

सारं जग जवळ आलंय म्हणतात

पण माणसं माणसांपासून

दूर धावताहेत

रोबोटच्या गळ्यात

गळा घालताहेत

माणसाऐवजी कुत्र्यांवर

कुत्र्याऐवजी यंत्रावर

विश्वास टाकताहेत

अशा शब्दातून महानगरीय जीवनाची मर्यादा स्पष्ट करतात. माणसाने आपल्या जाणीवा बदलल्या, व्यापकता दूर सारून संकुचितपणास जवळ केले. त्यामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचे विषद करतात.

जागतिकीकरणाचे चटके हे समाजातील अनेक घटकांना बसत आहेत हे दाहक वास्तव आहे. हे वास्तव अर्थात महानगरीय जाणीवेची घुसमट तीव्रतेने महेंद्र भवरे कवितेतून व्यक्त करतात. जागतिकीकरणाने केलेल्या उलथापालथीत महानगरीय जीवनातील मानवी मूल्यांचे पतन झालेले आढळते. कारण माणसाकडे माणूस म्हणून न पाहता एक ग्राहक म्हणून पाहिले जाते. अशा अत्यंत गुंतागुंतीच्या जगास कवी मपत्थर दिलफम्हणून संबोधतो.

Scanned with OKEN Scanner

त्याचा प्रभाव साहजिकच कवितेवर पडतो. नवदोत्तरी कालखंडात लिहिल्या गेलेल्या कवितेत महानगरीय जाणीवा ठळकपणे दिसतात. महानगरात राहणाऱ्या व महानगरीय जीवनाशी जाणीव असलेल्या अनेक कवींनी आपल्या कवितेतून महानगरातल्या भौतिक सुविधेसह महानगराचे बकालपण, प्रदुषण, मूल्यऱ्हास, असुरक्षितता, मोर्चे, बंदमूळे होणारी कोंडी, चंगळवाद, अराजकता, अविश्वास, बेगडी मुखवटे, मानवी जीवनात माणसापेक्षा वस्तुस, यंत्रास आलेले महत्त्व, टीव्ही, लॅपटॉप, संगणकाच्या सहवासात अधिक जाणारा वेळ, माणसातील तुटलेपण, स्वार्थीपणा, भावनाशुन्यता, नैराश्य एकूणच जागतिकीकरणाने मानवी जीवनात निर्माण केलेली गुंतागुंत यासारख्या असंख्य बदलांची नोंद मराठी कवितेने घेतली. या गोंधळाच्या विस्कळीत तसेच नव्या वास्तवाची आधुनिक दृष्टीने मांडणी करणाऱ्या कवींची एक पिढी पुढे आली. ज्यांनी नव्या युगाने उभ्या केलेल्या व्यवस्थेविषयी, सामान्य माणसाचे अस्तित्व ओरबाडणाऱ्या या नव्या काळाविषयी ही कविता बोलते. जी महानगरीय जाणिवा प्रकट करणारी कविता म्हणून ओळखली जाते.

महानगरीय परिस्थितीचे सुक्ष्म निरीक्षण, जीवनानुभूतीचे दर्शन आकलनासह कवितेद्वारा भाष्य करणाऱ्या कवी व कवयित्रींची संख्या मोठी आहे. ज्यामध्ये संजीव खांडेकर, हेमंत दिवटे, उत्तम कांबळे, अरूण काळे, मंगेश काळे, श्रीधर तळवे, महेंद्र भवरे, भूजंग मेश्राम, अजय कांडर, प्रविण बांदेकर, लोकनाथ यशवंत, दासू वैद्य तसेच प्रज्ञा लोखंडे यांसारख्या अनेकांचा समावेश होतो.

मराठवाड्यातील एक महत्वपूर्ण समीक्षक, परिवर्तनवादी चळवळीतील सक्रीय कार्यकर्ते, कवी ऋषीकेश कांबळे यांची मकविता शहराचीफ ही एक महत्वपूर्ण कविता आहे. या कवितेतून त्यांनी शहरातील माणसाच्या जगण्याची घुसमट चित्रीत केली आहे. नव्या शतकात ज्ञान–विज्ञानाने मोठी प्रगती केली. माणसाचा भौतिक विकास झाला. असे असले तरी माणुस माणुसकीला पारखा झाला आहे. माणसाच्या संवेदनाच बोथट झाल्या आहेत. परस्परावरील विश्वास उडालेला आहे. विकासाने माणूस माणसाच्या जवळ आला मात्र मनाने दूर गेला. इतरांच्या सुखदु:खाशी कसलेच देणे घेणे राहिले नाही. केवळ स्वत:पुरतं बघण्याची संकुचित प्रवृत्ती शहरात पहायला मिळ्ते आणि हेच जणू शहराला प्रिय असते. म्हणूनच अशी संवेदनाहीन माणसे या शहराची जणू शोकांतिकाच असल्याचे कवी नमूद करताना म्हणतो,

सखे, या शहराची रीत न्यारी आहे

उलटे काळीज बंद कप्पे ह्या शहराला प्यारी आहे.

Scanned with OKEN Scanner

BISC Vol 5 • Issue 2 • Feb 2018 • ISSN 2395-3748

फायबर ग्लासमधून सायबर न्ह्याहाळणारी नजर

नपुंसक जगावर घातले दगड

पत्थरदील युगाच्या आधुनिक वळणावर

थबकते जाग्यावर

किंवा ग्रहावरचे जग कसे झगमगतेय

अन् झक मारतात, मानवी मूल्यांचे जागर

महानगरीय वास्तवामुळे मानवी जीवनात होणाऱ्या बदलांचा, अवस्थांचा वेध घेतला आहे. त्यांना हे जग नपुंसक व संवेदनाहीन वाटते. महानगरातील माणूस आत्मकेंद्री, स्वकेंद्री बनला असून त्याची नजर फायबर ग्लासमधून सायबर ग्लासकडे वळलेली दिसते.

शहरी संस्कृतीत मानवी मूल्ये हरवत चालली असून सगळीकडे चंगळवदी संस्कृती व भौतिक सुखाचा गाजावाजा सुरू आहे. स्वार्थीपणा, पैशाला महत्व आले असून सर्वसामान्य माणसाची घुसमट त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. याची नोंद हेमंत दिवटे कॉस्मोसारख्या कवितेतून घेतात. बंदिस्त असलेल्या घरात बसून भौतिक सुखाचा अनुभव घेणारा माणुस बाहेरच्या जगासोबत संपर्क ठेवू इच्छितो पण हा संपर्क होऊ शकत नाही. त्यावेळी त्याच्या मनाची तडफड सुरू होते. यातून येणारी निराशा कवी हेमंत दिवटे डिप्रेशन सुरू होताना या कवितेतून अत्यंत भेदकपणे प्रकट करतात.

तुटत गेला संवाद

वाढत गेला पल्सरेट

महानगरीय जीवनात माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावातून आमुलाग्र बदल झाल्याने मानवी भावनेला किंमतच राहिली नाही. मानवी भावना एक जाहिरात झाली आहे. मानवी मेंदूतून प्रसुत झालेले तत्वज्ञान मयुज ॲन्ड थ्रोफ वाटू लागले आहे. या तत्वज्ञानास पायाच राहिला नाही. येथील संस्कृती घडविण्याऐवजी विकृतीच घडवित आहे. याची नोंद सुनील अवचार आपल्या कवितेतून घेतात.

या ग्लोबल वर्तमानात

भावना झाली आहे जाहिरात

Scanned with OKEN Scanner

आणि

मेंदूचे झाले आहे कम्प्यूटर

तत्वज्ञान झाले आहे युज अँड थ्रो

संस्कृती झाली आहे रखेल

एक प्रकारे मानवी भावनेस जाहिरातीचे स्वरूप आलेले दिसते. त्यामुळे भारतीय संस्कृतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे असे कवीस वाटते. ही संस्कृती बहुराष्ट्रीय कंपन्यांची रेखेल झाली असे वाटते. तिसऱ्या जगाचे प्रतिनिधीत्व करणारी सुनील अवचार यांची कविता महानगरीय जीवनाचा आलेख साकारते. या आलेखात कवी कॉमन मॅनला उभे करतो. जो कॉमन मॅन महानगरात अगतिकतेचे जिणे जगतो. एक ना एक दिवस जीवनातला अंधार संपून प्रकाश येईल हा आशावाद मधाब्यावरच्या वेटरची स्थिती नाही बेटरफया कवितेतून व्यक्त करतात,

मारो सालो ऽऽ हिरो इंटरव्हल तक

खाता है मार

द्धश एपव तक करता है

हिसाब, बराबर!

असा हा मध्यांतरापर्यंत मार खाणारा माणुस दुसरा तिसरा कोणी नूसन कॉमन मॅन असतो.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मानवी जीवन अधिक कृत्रिम बनले आहे. शहरातील मुलांना वस्तुसोबत खेळण्याची सवय झाली आहे. कारण त्यांच्यासोबत खेळण्यासाठी घरी कुणीही नाही. आईवडिल नोकरीनिमित्त सकाळीच घराबाहेर पडतात. मुलांचा सांभाळ आया करतात पण त्यांचे मनोरंजन होत नाही. अशावेळी मुले संगणकाशी खेळत राहतात. म्हणून प्रज्ञा लोखंडे मखेळफकवितेतून मुलांच्या एकांतातला प्रसंग व्यक्त करतात.

बंद खोलीत कम्प्युटरवर

खेळताहेत

एकएकटी मुलं

Scanned with OKEN Scanner

BISC Vol 5 • Issue 2 • Feb 2018 • ISSN 2395-3748

अख्खच्या अख्ख जग त्याच्या पुढ्यात

एकावर एक वेष्टनाची चळत लावून उभं

त्याच्यासाठी आतडं तिळतिळ तुटण्याची

वेळच आता संपून गेलीय

मुलांच्या पुढे अवघे जग उभे केले गेले असले तरी जवळची माणसे दूर गेली आहेत. प्रेमाची भूकेली असलेली मूले कोमेजून जातात. आईवडिलांकडे त्यांच्यासाठी वेळच नसतो. महानगरातले जीवन इतके धकाधकीचे झाले आहे की, मुलांसाठी आतडे तुटण्याची वेळ केंव्हाच संपून गेलीय या ओळीतून हा खेद व्यक्त होताना दिसतो.

जेंव्हा माणूस नोकरीच्या निमित्ताने शहराकडे धाव घेतो, वास्तव्य करतो. तेंव्हा तेथील जीवन कसे आहे हे अशोक इंगळे मतुझ्या स्वागतासाठीफ या कवितेतून टिपतात.

जिथे माणसांचा स्वभाव बदलतोय

शहर बाजारातील निर्देशांकावर

आणि माणसे विकल्या जातात

जनरल स्टेअर्समधील वस्तुसारखी

दहशतवादी कारनाम्यांसाठी

संस्कृतीचे बाजारीकरण होऊन मूल्यांचा ऱ्हास होत आहे. माणसाकडे वस्तू म्हणून पाहिले जात आहे. माणूस स्वार्थासाठी दहशतवादी कारनाम्यासाठी जनरल स्टोअर्समधील वस्तुसारखी विकली जात आहेत. अर्थात माणूस हा पैशाचा बळावर बदलत चालला आहे.

२१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर जन्म घेणाऱ्या श्रीकृष्ण राऊत यांच्या मतान्धा मूलफ या काव्यसंग्रहातून महानगरीय जाणीवा मोठ्या प्रमाणात प्रकट झालेल्या दिसतात. ते या शहरी जीवनातील धावपळी विषयी लिहीतात,

शहरात पोटामागे पळपळ पळणारांना

कॅलेंडरची पानं उलटायलाही

नसते फुरसत

वाढणारे अंगावरचे केस

अन् बोटाची नखेच

काळ पुढे सरकल्याचे सांगतात

या ओळीतून कवीने धक्काधक्कीचे जीवन जगणाऱ्या माणसाचे वर्णन केले आहे. कामाच्या रगाड्यात माणूस इच्छा असूनही माणसात मिसळू शकत नाही. तंत्रज्ञानवादी व भौतिकवादी सुविधेने त्याची धारणा बदलत चालली आहे.

याशिवाय मंगेश काळे, नीरजा यांनीही महानगरीय जगणे दिवसेंदिवस कठीण बनत चालल्याची जाणीव तीव्रतेने व्यक्त केली आहे. महानगरीय जगण्याचे केंद्रच बदलत असल्याची जाणीव व्यक्त होते. अशा प्रकारे मराठी कवितेतून प्रामुख्याने १९९० नंतरच्या कवितेतून महानगरीय जीवनजाणीवा प्रखरपणे प्रकट झालेल्या दिसून येतात.

निष्कर्ष :

महानगरीय कवितेतून महानगरीय जाणीव, तुटलेपणाची भावना, मानवतेच्या अस्तित्वाची तळमळ, लयास चाललेली कुटूंब संस्कृती, मूल्यांची होणारी पडझड यांचे वास्तववादी चित्रण आले आहे. जी कविता अंतर्मूख करते. जीवनातील अस्थिरतेचे, अमानुषतेचे गढूळ वातावरण कवीस अस्वस्थ करते. जागतिकीकरणाने अवघे मानवी जीवनच बदलून गेलेले आहे. त्यास महानगरीय जीवनही अपवाद नाही. महानगरे ही कवींच्या केंद्रस्थानी असून शहरी माणसांच्या गर्दीत माणुसकी सापडणे कठीण होऊन बसल्याचे दिसते. महानगरात जाणवणारे एकाकीपण, तुटलेपण, दांभिकता, स्वार्थीवृत्ती, अमानुषता, अश्लीलता यांचे प्रामुख्याने चित्रण आलेले आहे. महानगरीय जाणीवांच्या नात्यातील जिव्हाळा, प्रेम, आपुलकी संपुष्टात येत आहे. संस्कृतीचे बाजारीकरण होऊन मानवी संवेदनेची धार बोथट झाली आहे. महानगरीय जाणीवेत बदलणाऱ्या मानवी जगण्याबद्दलची चिंता, तडफड, आकांक्षा मोठ्या प्रमाणात व्यक्त होते. महानगरीय वास्तवामुळे मानवी जीवनात येणाऱ्या बदलांचा, त्यातील विविध अवस्थांचा वेध ही कविता घेते. जागतिकीकरण व आधुनिकीकरणाच्या नावाखाली सुरू असलेले सामान्य माणसांचे अगतिकीकरण विशेषत: मूल्य ऱ्हास व मानसिक पातळीवरील पडझडीचे सुक्ष्म चित्र ही कविता व्यक्त करते. एकूणच

Scanned with OKEN Scanner

BISC Vol 5 • Issue 2 • Feb 2018 • ISSN 2395-3748

नवदोत्तरी कवितेतून महानगरीय जाणिवांचे, वेदना व संवेदनांचे अविष्करण समर्थपणे प्रकट झाले आहे.

संदर्भग्रंथ :

१) उत्तम कांबळे मजागतिकीकरणात माझी कविताफ (संपा.), परचूरे प्रकाशन, मुंबई.
२) दिवटे हेमंत (संपा.), मअभिधानंतरफ मुंबई.
३) नलिनी पंडित, मजागतिकीकरण आणि भारतफ लोकवाङ्मयगृह, मुंबई.
४) (संपा.) मराठी अभ्यास मंडळ, डॉ. बा. आं. म. विद्यापीठ, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, एप्रिल २००८.
५) विजया राजाध्यक्ष, मकवितेपासून कवितेकडेफ विजय प्रकाशन, २०१२.
६) प्रज्ञा लोखंडे, मखेळ उत्कट जीवघेण्या धगीवरफ
७) श्रीकृष्ण राऊत, मतान्ह्यामुळाफ २००१.

Scanned with OKEN Scanner